**अधीक्षक अभियंता व सहसंचालक**
**महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी**
**जलसंपदा विभाग, दिंडोरी मार्ग, नाशिक - ४२२ ००४**

**संपर्क:- व्या. परीक्षा -०२५३-२५३ २८७९** **ई-मेल** :- pemetansk@gmail.com

**जा.क्र.** मअप्रप्र/व्या.परीक्षा/(नस्ती क्र.-०३/२०२४)/104/२०२४ **दि. १३/०९/२०२४**

# परिपत्रक

**विषय:-** सहाय्यक अभियंता श्रेणी २/ सहाय्यक अभियंता (राजपत्रित) स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) व कनिष्ठ अभियंता (अराजपत्रित) (स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) गट ब संवर्गाकरीता - माहे ऑगस्ट २०२४ मध्ये नियोजीत ऑनलाईन व्यावसायिक परीक्षेबाबत.
नियंत्रक अधिकारी यांनी कागदपत्रे व ग्राहयता तपासणे बाबत...

**संदर्भ:-** या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. ७५ दि. ३१/०७/२०२४

सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (राजपत्रित) व कनिष्ठ अभियंता (अराजपत्रित) या संवर्गाच्या व्यावसायीक परीक्षरेसाठी नवीन परीक्षा नियम माहे जुलै २०२४ मध्ये शासन अधिसुचनेद्वारे प्रकाशित करण्यात आलेले आहेत. सदर नवीन परीक्षा नियमानुसार गट-ब संवर्गाची व्यावसायीक परीक्षा दि. २ सप्टेंबर व ३ सप्टेंबर रोजी आयोजीत करण्यात आली होती. विविध तांत्रिक अडचणी व परीक्षा नियम सुधारण्याबाबतच्या कार्यवाहीमुळे, गट-ब संवर्गाची व्यावसायीक परीक्षा अडीच वर्षापासून आयोजित न होऊन अनेक अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबी प्रलंबित असणे, ही बाब व आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन सदर परीक्षा लवकरात लवकर घेणे आवश्यक होते. यामुळे परीक्षार्थींनी सादर केलेली कागदपत्रे, ग्राह्यता व इतर बाबी तपासण्यास मर्यादीत कालावधी मिळाला होता.

या परीक्षेसाठी प्रथमच ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले होते. परीक्षेचे अर्ज ऑनलाईन सादर करताना, ऑनलाईन अर्जासोबत खालील बाबी सादर करण्याविषयी परीक्षार्थींना या कार्यालयाच्या संदर्भाकींत परिपत्रकान्व्यवे सुचित करण्यात आलेले होते.

१) नियंत्रक अधिकारी प्रमाणपत्र

२) परीक्षा शुल्क भरण्याची पावती (लागू असल्यास)

३) विषयातील सुट बाबत मागील परीक्षेचा निकाल

४) Disability Certificate (लागू असल्यास)

सर्व परीक्षार्थींनी ऑनलाईन अर्ज भरतेवेळी अर्जाची प्रिंट काढून सर्व आवश्यक कागदपत्रासह नियंत्रक अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक होते. परंतु ऑनलाईन अर्ज मर्यादीत कालावधीत सादर करण्याच्या

आवश्यकतेमुळे  काही परीक्षार्थीनी उपरोक्त कागदपत्रे संबंधीत नियंत्रक अधिकारी यांचेकडे सादर केली नसल्याचे आढळून आले आहेत. तरी, अशा परीक्षार्थीनी उपरोक्त सर्व कागदपत्रे आपापल्या नियंत्रक अधिकारी यांचेकडे सादर करणेविषयी सुचना परीक्षार्थींना यापुर्वीच दिलेल्या आहेत.

त्याच अनुषंगाने सर्व नियंत्रक अधिकारी यांना विनंती आहे की, सदर व्यावसायीक परीक्षेस बसलेल्या आपल्या अधिनस्त अभियंता / कर्मचारी यांनी वरील नमुद केल्याप्रमाणे कागदपत्रं आपल्या कार्यालयास सादर केल्याची तपासणी करावी, तसेच, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावरील परीक्षार्थी यांनी यापूर्वीच स्थापत्य अभियांत्रिकी पदाची अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण आहे याबाबत आवश्यक निकालाची पडताळणीही करावी. उपरोक्त तपासणी व पडताळणीमध्ये परीक्षार्थीनी सादर केलेली माहिती अर्ज व कागदपत्रे, पात्रता निकष, इ. बाबत काही त्रुटी आढळल्यास ई-मेल द्वारे त्वरीत या कार्यालयाच्या निदर्शनास आणून देण्याचीही विनंती आहे, जेणेकरुन परिक्षेचा निकाल नियोजीत वेळेत जाहीर करता येईल.

**(प्र. मो. बावीस्कर)**
अधीक्षक अभियंता व सहसंचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाशिक

प्रत- मास्टर फाईल २०२४.